

सय....

ई-प्रकाशन मराठीवर्ल्ड.कॉम

'ऐका दाजिबा' वर ठेका धरणारी आजची तरुण पिढी सौमित्रचा 'गारवा' ऐकतांना तितकीच हळूवार होते. मराठीवर्ल्ड.कॉम ने प्रेम कवितांचे ई-पुस्तक काढतांना वाचकांना संवेदनाशील आणि अर्थपूर्ण प्रेमकाव्य वाचायला द्यायचे ठरवलं. योगायोगाने डॉ.भरत सोहोनींच्या १९६१ सालातल्या कविता हाती आल्या. कविता काही वर्षांपूर्वीच्या असल्या तरी त्यातलं काव्य आजच्या इतकचं ताजं आणि टवटवीत आहे. प्रत्येक कवितेगणिक कविची प्रगल्भता आपल्याला जाणवत राहते. प्रेमाचे मिलन ते विरह हा प्रवास वाचकांना अस्वस्थ करतो. आमच्या इतकंच हे काव्य आपल्याला जरुर आवडेल अशी आशा आहे. आपल्या प्रतिक्रिया आम्हाला जरुर कळवा.

सौ. भाग्यश्री केंगे
संपादक

सय

कवि -	कै. डॉ. भरत सोहोनी
ई-प्रकाशन -	मराठीवर्ल्ड.कॉम, २०५,अमर आर्केड, साधू वासवानी रोड, कुलकर्णी कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक -२ दूरध्वनी - २५७३१९७.
ई-मेल -	info@marathiworld.com
कविता संकलन -	सौ. भाग्यश्री केंगे
सजावट आणि मांडणी -	प्रफुल्ल जामनेरकर
तांत्रिक सहाय्य -	अनुराग केंगे,सुवर्णा घुले
ई - प्रकाशन -	२० फेब्रुवारी २००५

अर्पणपत्रिका
ती. काकांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन-
अलकनंदा केंगे.

स्य....

नाशिक येथे संपन्न झालेल्या ७८ व्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने मला वडिलांची प्रकर्षाने आठवण झाली. डॉक्टरची पदवी मिळाल्यानंतर ध्येयाने प्रेरित झालेले माझे वडील डॉ. भरत प्रभाकर सोहोनी यांनी १९३० साली खेडे असलेल्या लासलगावी दवाखाना काढला. रुढ अर्थाने त्यांनी पैश्यासाठी डॉक्टरकी केलीच नाही. त्यामुळे खेड्यातल्या गरीब आणि गरजू लोकांचे ते आधारस्तंभ होते.

दुर्दैवाने सहचरी अर्ध्या वाटेवर सोडून गेल्यामुळे तीन मुलांच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्यावर आली. मुलांचे 'बाबा' असण्याबरोबरच 'आई' होतांना त्यांनी आपले संवेदनाशील मन कवितेतून व्यक्त करायला सुरुवात केली. कॉलेज जीवनात सहज म्हणून केलेल्या कविता आता अधिक प्रयत्नपूर्वक अभिव्यक्त होऊ लागल्या. त्याचबरोबरीने आरोग्यविषयक लेख, वैचारिक लेख, कथा तसेच ललित साहित्य विविध नियतकालिकातून ते नित्यनेमाने लिहीत.

१९६१ साली पूर्व प्रसिध्द झालेल्या ह्या कविता नविन पिढीपर्यंत पोहोचवायला मराठीवर्ल्ड.कॉमचे व्यासपीठ उपलब्ध झाले. स्नुषा सौ. भाग्यश्रीच्या सहकार्याने कवितांची निवड करतांना मन 'काकांच्या' (आम्ही प्रेमाने त्यांना काका म्हणायचो) आठवणीत रमले..

मावळतीचा रंग, उषा व संध्या ह्या कविता काकांच्या संवेदनाशील मनाची साक्ष देतात. कृष्ण-राधेचे प्रेम, आपल्या प्रियतमेचे वर्णन करणारा हा डॉक्टर आहे का कवि ? असा संभ्रम निर्माण होतो. विविध विषयांवरच्या कविता काकांनी केल्या असल्यातरी काही निवडक प्रेम कविता ई-पुस्तकांसाठी निवडल्या आहे.

हे ई-पुस्तक तयार करण्यासाठी माझ्या मुलाची अनुरागची मदत तर होतीच पण तांत्रिक बाजू सांभाळणाऱ्या मराठीवर्ल्डच्या चमूचे ही आभार.

अलकनंदा केंगे

नाशिक

रविवार माघ शु. १२, २००५

मावळतीचा रंग गुलाबी

मावळतीचा रंग गुलाबी
तुझ्या रेशमी गालिं चमकला
आणि प्रीतीचा चंद रुपेरी
माझ्या हृदयक्षितिजिं उगवला ।
भावसागरा आली भरती
रोमांचाची फुले बहरलीं
हुरहुर कांटा मात्र सलतसे
आणि मनाला ग्लानी आली।

oo

चमक विजेची क्षणी उतावीळ
प्रीतीची अन् मादक धुंदी
जिवा जाहली जखम विखारी
कुणा दाखवूं करुनी उघडी





तुझ्या निळ्या डोळ्यांत हांसऱ्या

'तुझ्या निळ्या डोळ्यात हांसऱ्या
प्रीतीच्या भावना उजळल्या '
संकोचाच्या पापणीनें पण
रोधितांच कोमेजुनि गेल्या !
उगाच हंसणे, रोखुनि बघणे
ऊनपावसाचे जणुं लेणें
ना ओळख, ना देख परंतु
कसा गुंतला प्रीतीतंतू ?
नैराश्याच्या निशेतही पण-
प्रकाशती आशेचे कणकण
अलभ्य ऐशा प्रेमामागुन
विषण्ण माझे धावे हे मन
नको निशा अन् दिवसहि हिरवा
त्यांहुनि संधिप्रकाश बरवा !

हळूं हळूं सख्या, बोल !

हळूं हळूं सख्या, बोल !
नको वाजवू पाऊल
कुणा लागेल चाहूल
आणि घात रे, होईल !

यौवनाची ही नव्हाळी
अंगी करी सळसळ
वीज जणूं चमकली
आणि काय उठे लोळ ?

तुझे राजीव लोचन
आणि अंगलट छान
मला घेऊ दे पाहून
असा पुन्हां न ये क्षण !

माझ्या हृदयाची वीणा
तुझा प्रीतिस्वर छेडे
तुझ्यासाठी मन वेडे !

बघ झाली सांजवेळ
मनी वाढे हूरहूर
काय 'चांद' 'चकोरीला' -
नाहीं पुढें दिसणार ??

आल्या श्रावणसरी

"आल्या श्रावणसरी । मुकुंदा ।
आल्या श्रावणसरी" ।।धृ।।
येउनि हळुं चोरट्या पाउलीं
रंगाची पिचकारि मारिली
साडि रेशमी सारी भिजली
आणि कंचुकी उरीं ।।१।।
अंगी भरला कसा शहारा
कशास धरिसी माझ्या पदरा
तीक्ष्ण जनांच्या खिळतिल नजरा
सोड मुकुंदा तरी ।।२।।
खुशाल हंससी गोंडस गाली
इंद्रधनूची रंगत लाली
हर्षात तुझ्या वीज चमकली
किमया अद्‌भुत खरी ।।३।।
ऐकुनि मुरलीचे तव सुस्वर
झाले वेडें माझें अंतर
कशा छेडिसी असे निरंतर
भरल्या वाटेवरील ।।४।।

मला वाटसी हवाहवासा
छळिसी - छळ वाटतो गोडसा
घनशाम, करि शांत मानसा
तव प्रीतीच्या सरीं ।।५।।



काळ्या धूसर आकाशात

काळ्या धूसर आकाशांत
मधुनि चमकती प्रकाश रेखा
निराश तैशा मद् हृदयांत
आशेचा नव फुले फूलोरा ।।
प्रखर उन्हानें जीव पोळता
मृगजळ वाढवि मना पिपासा
शितल सुगंध पवनाची पण -
झुळूक वाढवी मनि मादकता ।।
अलभ्य तेंही मिळण्यासाठी
जीव कधिं कधीं करितो धडपड
अपयश येतां पदरी उलटें
उत्साहाचा दीप काजळे ।।

o o o

काळ्या कभिन्न अंधाराला
वीज मारिते डंख विषारी
हुरहुर बोंचे तशी मनाला
अधीरतेला ये अंधारी ।।

प्रीति-देवतेस

वाटताती तुच्छ पुष्पांच्या माळा
सुकुमार करीं गुंफितां गळा
प्रेमळ स्पर्शाचा देहिं रोमांच
हृदयांत सले नाजुक बोंच
स्नेहपूर्ण नेत्र लावितां नेत्री
येईल भराला वाटते प्रीति
अमृत नलगे, देई जीवन-
प्रीति-देवतेचे ओष्ठ-मीलन
विसर देहाचा, मनाचा पडे
स्वर्ग-सौख्य तेंहीं तुच्छ यापुढे !
लाभली गे, तुझ्या प्रीतीची तरी
संसार-सागर लंघीन तरी

o o o

आपुल्या प्रीतीचें गाऊ ये, गीत
तारुण्याचा फुलला गे वसंत !

हांस, गडे, हांस-!

गालीं हृदवृत्तिसांज उदय पावली ।
'हांस, गडे, हांस,-' अशी उमलुं दे कळी ।।
शेवटची भेट असे
नयनों कां नीर दिसें ?
पुसुनि टाक आज कसें !
वृत्ति भंगली !

प्रीतीची मधुर कळी
भिजवीसी अश्रु-जळी ;
फुलवुं काय मीच भली ?
नजर लागली !

वेलीवरिं दंवबिंदू
प्रेमाचा नवसिंधू
भ्रमर होत काय लुटूं ?
सांग सत्वरी !

संध्या- छे ! लुप्त उषा
वरि हंसते अस्ताला
'हांस, गडे, हांस,' मला -
आस लागली !

कुणास तरी -!

"तुजविण जीवन होय सहारा
अमृतसिंचन करी अपारा" ।।धृ।।

रोजहि गालीं गुलाब फुलती
कमलें तेजोमयही नेत्री ;
पारिजात कां लपलें ओष्ठी ?
फुलला बाग तुझा हा गहिरा ।।१।।

भाषणांत तव द्राक्ष-माधुरी
तुझी नजर ही सदा नाचरी
वेध पार घेतसें अंतरा

कुंतल भुरभुरती वाऱ्यावर
अंचलही हलतो स्कधांवर
उरज दावितो यौवनभूषण ।।२।।

० ० ०

तुझ्या दर्शनें मी बेजार
पडंता गांठ अशी रस्त्यावर
संकोचानें मात्र भावना
मनांतल्या त्या मनीं राहती ।।३।।

रोज उभा राहुनि वळणावर-
तुझीं पाहतों वाट राजसे ।
कधीं सांग, जीवनांत माझ्या -
करिशिल सिंचन प्रेमसुधेचें ?।।४।।

कोणास तरी

संध्या आणि उषा या दोन्हीं
तुझ्या ओठी एक जाहल्या
रंग तयांचा आणि गुलाबी
गोंडस गालीं तुझ्या उधळला ।
रदन धवल - छे ! तारापंक्ति
तयामुळें ये हर्षा कांति
श्यामल कुंतल दाट मेघ ते
भांग तयातुनि वीज नाचते ।
सजल पापण्या थरथर लवती
काजळरेखा मधुनि चमकती
फुलता यौवन लाजलाजुनी
कमलकळ्या दों येंती बहरुनी ।
नीटस ही नासिका मेधोनी
नयना शोभवि कोन साधुनी
तालबध्द या पदयुगुलांची
चाल कुठें शिकली नवतीची ?
नसानसांतुनि फुले चांदणे
काय प्रीतिचे घुमतें गाणें
रुपसुधा घेउ दे पिओनी
नयनांचे हे प्याले भरुनी
नेत्रकटाक्षांच्या बाणांनी
नकोस विंधू हृदया सजणी
होउल अंतरिं दाह तत्क्षणीं
शमविशील कां प्रीतिसिंचनी ।।

सखे ! तुझी आठवण

"सखे तुझी आठवण -
सदा दुभंगतें मन
आणि जीवित ग्रंथाचे-
रोज उलटतों पान ।
' काल ' काळांत विराला
'भविष्याचे ' कोणा ज्ञान ?
'आज' मात्र उभा पुढे
झिरपती क्षणक्षण।
'सखे, तुझी आठवण'
जणूं मृद्‌गंधाची खाण
स्मृती पाकळ्या हुंगून ।
जीव गेला वेडावून ।
सखे ! तुझी आठवण
वाटे आशेचा किरण
नैराश्याच्या अंधारांत
वेंचितसे कणकण ।
सुखदुःख यांच्या सीमा
विरागांत विसावल्या
आर्द्रशांतता सांवल्या
लाल उन्हानें कोरल्या ।

★ ★

' सखे ! तुझी आठवण '
वेंची जिवांचे पांखरुं
सांग, तुझ्यासाठी कोठें-
झेंप घालुनिया फिरुं ।



सखि म्हणु नको दुकाळ

सखि म्हणु नको दुकाळ
तुझ्या संगती सुकाळ ।।
पोरे ही धरुनि फेर
नाचतात मत्त मोर
गाती जणुं खग सुस्वर
श्रवण तृप्त झाले ।।१।।
खोपट हे बांधावर
आंब्याची छाया वर
शिवाय डोलते समोर
नयन हे सुखावले ।।२।।
होतां आणी दुपार
राबुनिया शेतावर
येतां तू अन् समोर
हर्ष मनि दुणावे ।।३।।
कोरड्यास अन् भाकर
लेज्जत त्या बेसुमार
तृप्तीची ये ढेकर
जीव हा सुखावे ।।४।।
पहुडावे मांडीवर
म्हणसी तू "हे न बरं!
काय जाहलात हो पोर
शोभती न चाळे !"
अंधारुनि जग येतां
तुझ कवेंत सखि घेता
माझा मी नच उरता
स्वर्गच ये जणु हातां ।।
दुःख ते नुराले ।६।

अजूनि

अजूनि तुझी कानी ये
मन्द चरण चाहूल
जागति आली उदया
वाटे जणूं स्वप्नांतील
अजूनी येई साकारुनी
मूर्ती नयनासमोर
उत्कंठा मानसमयूर
अजुनि तुझा आठवतो
स्पर्श मधुर या शरिरीं
हलावत कंपित जाई
तरंग जणूं सलिली
तनु लतिकेचा सुगंध
धुंद करी अजुनी मन
पवनावर येई तुझा
अजुनि मंजु मधुर स्वन
'कणकण' काया फुलुन
जीव जाई मोहरुन
वठलेला वृक्ष पुन्हा
येत असे पालवून





हर्ष केतकीचें बन
नागापरि नादावून
उजळूनी स्मृतिदीप जीव
जाई हा भारावून
काजळत्या छायेतून
भास तुझा पाहतसे
ओलांडूनी काळ पुन्हा
मधुर स्वप्न हासतसे
क्षणक्षण ये अंधारुन
आणि पुन्हां तेजाळून
जीव घाबरा होई
काळ हंसे खदखदून
उचकुनि मी बघत बसे
रोज स्मृति स्मृतीचे घडे
अजुनि नाही उलगडले
मजला जीवित कोडे

o o o

येणार न पुनरपि तूं
ठाऊक हें असूनि तरी
अजुनि तुझी पाहतसे
वाट इथे वेडयापरि

* समाप्त *